संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# कौशल्य विकासात सरकारच्याच कौशल्याचा कस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत हा कौशल्यपूर्ण मनुष्यबळाचे जागतिक केंद्र व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. केंद्र सरकारने अलीकडेच देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि कुशलतंत्रज्ञ तसेच कारागिर तयार करण्याकरिता कौशल्य विकसित करणाऱ्या उपक्रमाची सुरुवात केली आहे. त्याचे उद्घाटन मोदींच्या हस्ते झाले. पंतप्रधानांनी आपल्या देशाविषयी ही अपेक्षा व्यक्त करणे काहीच गैर नाही. परंतु याच्याबरोबरीने चीन हा देश जागतिक उत्पादन केंद्र म्हणून पुढे आला आहे. हे मान्य करून भारत तशी उत्पादन केंद्रे होऊ शकेल किंवा नाही याबद्दल त्यांच्या मनात शंका दिसते. भारतातले दारिद्र्य गरिबी दूर करण्यासाठी या कौशल्य विकासाची नक्कीच आवश्यकता आहे. याकरिता केंद्र सरकारने जो पुढाकार घेतला आहे तोदेखील कौतुकास्पद ठरतो. परंतु या योजनेची सुरुवात मोठा गाजावाजा करून झाली. तशीच त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली पाहिजे. केंद्रातले हे सरकार नवीन आहे. त्यांना नवनवीन योजना सुरू करून लोकांची मने जिंकायचीच आहेत. आपले सरकार कसे काम करणारे आहे, हेही दाखवून द्यायचे आहे. आतापर्यंतच्या काँग्रेस सरकारने घोषणा भरपूर केल्या. परंतु दारिद्र्य, गरिबी, बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टिने ठोस आणि कल्पक उपक्रम राबविले नाहीत. आता नरेंद्र मोदी वेगळ्या पध्दतीने आणि देशाची नेमकी गरज लक्षात घेऊन काही योजना राबवित आहेत. त्याचा त्यामागचा हेतू चांगला आहे. परंतु नेहमीप्रमाणे सरकारी पातळीवर वेगवेगळ्या उपक्रमांची सुरुवात तर होते, पण शेवट अपेक्षेप्रमाणे होत नाही. तो अनुभव या कौशल्यविकास कार्यक्रमाबाबत येऊ नये एवढीच जनतेची अपेक्षा आहे.सरकारने या योजनेबाबत जी काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली आहेत, ती पूर्ण करायची असतील तर गावपातळीपर्यंत त्याचा नीट संदेश गेला पाहिजे. प्रत्यक्ष तरुणांना सहभागी करून घेण्यासाठी शिक्षण संस्थांचा आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढवला पाहिजे.

## सर्वाधिक युवा शक्ती

देशातील लाखो तरुणांना त्यांच्या गुणवत्तेच्या विकासाची संधी देण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. केवळ इंजिनिअरींग किंवा आयआयटी झालेल्या हुशार तरुणांसाठी हा कार्यक्रम नाही तरी अगदी खेड्यापाड्यातील आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या तरुणांनादेखील त्यात सहभागी केले जाणार आहे. विविध गट आणि स्तर पाडून सगळ्यांना संधी देण्याचा सरकारचा प्रयत्न तर दिसून येतो. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारलाच आपले कौशल्य पणाला लावावे लागणार आहे. कौशल्य आधारित विकासासाठी किंवा तरुणांमधल्या कौशल्यासाठी सरकारने नेमके कोणते कौशल्य आत्मसात केले आहे, तेदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते. याचा अर्थ कौशल्य विकासासाठी सरकारच्याच कौशल्याचा खऱ्या अर्थाने कस लागणार आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. ही गोष्ट खरी आहे की स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच भारतातील तरुणांचा त्यांच्यामधल्या गुणवत्तेचा तसेच कौशल्याचा किंवा त्यांनी घेतलेल्या आवडीच्या शिक्षणाचा विचार केला जात आहे. भारतात सध्या तरुणांची संख्या जास्त आहे. १८ ते ३५ या वयोगटातील ६० टक्के तरुण ज्या देशात आहेत, तिथे तरुणांविषयी किंवा त्यांच्या बुध्दिमत्तेला वाव देणाऱ्या योजना राबविल्या जाणे आवश्यक ठरते.त्या दिशेने पहिल्यांदाच सकारात्मक पाऊल पडले आहे. आज भारतामध्ये तरुणांना शिक्षण घेऊनही मनासारख्या नोकऱ्या करता येत नाहीत. एवढेच नव्हे तर उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी सुध्दा अनुकूल वातावरण मिळत नाही ही युवा शक्ती वाया जाऊ द्यायची नसेल तर या कौशल्य आधारित कार्यक्रमाचा काही प्रमाणात उपयोग होऊ शकतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर युवकांसाठी चर्चासत्र, परिसंवाद, किंवा तालुका गावपातळीवर प्रत्यक्ष शिबिरे घेतली गेली पाहिजेत.तरच त्याचे महत्व बिंबवता येऊ शकेल.

## कुशल कामगारांचा पुरवठादार नको

येणाऱ्या काळामध्ये तर जागतिक स्पर्धेत भारताला टिकून राहायचे असेल तर मनुष्यबळ नव्हे तर उत्पादन क्षेत्रामध्येसुध्दा स्वतःचे स्थान निर्माण करावे लागेल. मोदी म्हणतात त्याप्रमाणे भारत हे कौशल्य असलेल्या मनुष्य बळाचे जागतिक केंद्र जरी झाले तरी भारताची झेप ही चीन किंवा जपानप्रमाणे विज्ञान तंत्रज्ञान आधारित उद्योग निर्माण करण्याची असली पाहिजे. नाही तर भारतात कौशल्य विकसित करायचे आणि त्याचा वापर अमेरिका, चीन, जपान किंवा अन्य देशांनी करायचा असे होत राहिल, आजदेखील भारतात उत्तम शिक्षण घेतलेले तरुण चांगल्या नोकरीसाठी परदेशात जातात. या तरुणांना तिथल्या कंपन्या चांगल्या पगाराचे आमिष दाखवून आपल्याकडे खेचून घेतात. या मुलांच्या शिक्षणावर त्यांचे आईवडील लाखो रुपये खर्च करतात त्यांच्यामधल्या गुणवत्तेला, बुध्दिमत्तेला विकसित करतात. शेवटी त्याचा उपयोग स्वतःच्या देशापेक्षा परदेशातल्या कंपन्याना होतो आणि म्हणून आताच ही खबरदारी घेतली पाहिजे, की कौशल्य विकसित करताना त्याचा उपयोग आपल्याच देशासाठी झाला पाहिजे. मेक इन इंडिया हे ध्येय गाठायचे असेल तर भारत हा निर्मात्यांचा देश ठरला पाहिजे. तो केवळ कुशल कामगार फिरविणारा पुरवठादार होता कामा नये. भारत हा लेबर फोर्स न होता, वेगवेगळ्या उद्योगांचा, उत्पादनांचा ओनर झाला पाहिजे. भारत हा मुळापासूनच विविध कल्पनांचा देश मानला जातो.आता त्याला कौशल्याची जोड देऊन तो प्रकल्पांचा देश होऊ शकतो.